विषय – कोवीड-१९ विमा संरक्षण कवच विहित नमुन्यातील प्रस्तावाबाबत...

सातारा जिल्हा परिषद, सातारा
जा.क्र.आस्था-२(३)/परिपत्रक/कावि/७४२/२०२०
सामान्य प्रशासन विभाग
दिनांक- १६ सप्टेंबर, २०२०.

## परिपत्रक

या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, "कोरोना-१९" विषाणू या आजाराच्या संसर्गामध्ये वाढ होत असल्याने सदर आजाराच्या प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्याबाबत शासनाने वेळोवेळी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना सदर आजाराच्या संसर्गाच्या संख्यमध्ये दिवसेदिवस वाढ होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने सातारा जिल्हा परिषद अंतर्गत सर्व खातेप्रमुख/गट विकास अधिकारी व कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांना सदर आजाराचा संसर्ग झाल्याचे बाब निदर्शनास आल्यास संबधित अधिकारी/कर्मचारी यांची माहिती आपणास दिलेल्या लिंकमध्ये तत्काळ भरण्यात यावी, तसेच जे अधिकारी/कर्मचारी सदर आजारामुळे मयत झाले आहेत, त्यांचाबाबत शासनाने जाहिर केलेल्या कोवीड-१९ विमा संरक्षण कवच विहित नमुन्यातील प्रस्ताव शासनास सादर करण्याकामी वरिष्ठ कार्यालयास पाठवावे, सदरबाबत हलगर्जीपणा व अगर दिरंगाई झाल्याची बाब निदर्शनास आल्यास त्याबाबतची जबाबदारी आपणावर निश्चित करून यथानियम कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(संजय भागवत)
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा
मोबा. ९४२२९९३३३३
ceozpstr@gmail.com

प्रति,

१. सर्व खातेप्रमुख,
सातारा जिल्हा परिषद,सातारा .........

२. गट विकास अधिकारी,
पंचायत समिती सर्व .......................

३. संबंधित कार्यालयाचे कार्यालय प्रमुख (सर्व.....)

Scanned with CamScanner